# भारत — पाकिस्तान संबंध सर्जिकल स्ट्राईक

प्रा. संतोष केशव खडसे, राज्यशास्त्र विभाग ,कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर, जि.सांगली
प्रा. सुनिता संतोष बोर्डे—खडसे, इतिहास विभागप्रमुख, श्रीमती सी. बी. शहा महिला महाविद्यालय, सांगली.

.............................................................................................................

- **प्रस्तावना —**

१६ सप्टेंबर २०१६ रोजी उरी येथे झालेल्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्याला भारतीय लष्काने दिलेले प्रतिउत्तर व त्यांचे भारतीयांच्या जीवनावरील पडदास राजकीय पक्षांची मते तसेच सत्तेत असणाऱ्या शासनाची कार्यपध्दती यांचा थोडक्यात आढावा. या पेपर मध्ये घेण्यात आला आहे. भारत—पाकिस्तान संबंध व सर्जिकल स्ट्राईकचे गांभीर्य कळायला उरी येथील लष्काराच्या तळावर झालेल्या दहशतवादी हल्याचे परिणाम कळायला हवेत. १८ सैनिकांचा जीव घेणारा हल्ला झाल्याने संपूर्ण भारतात संतापाची लाट पसरली. तेव्हा लष्करांच्या मानसन्मानाला ठेच लागली. अशा वेळी लष्कराचे मनोधैर्य खचण्याची शक्यता असते. त्यामुळे याचा निषेध केवळ शब्दांनी करून भागत नाही. तर दहशतवादयांना अदद्ल घडेल अशा प्रकारे कृतीतून उत्तर दयावे लागते. तेच आपल्या भारतीय लष्काराने सर्जिकल स्ट्राईल करून केले.

भारताने पाकिस्तानी दहशतवादयांविरूध्द प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपलीकडे केलेल्या सर्जिकल स्ट्राईल वरून सध्या चाललेले राजकारण दुर्देवी आहे. या कारवाईबाबत शंका निर्माण करून केंद्र सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा विरोधाकांचा प्रयत्न आहे. भारतीय लष्कराने सरकारकडून मुक्तहस्त मिळताच आपले काम व्यवस्थित तडीला नेले. त्यांची घोषणाही प्रचलीत पध्दतीनुसार डायटेक्टर जनरल ऑफ मिलीटरी ऑपरेशन्सद्वारे देशांसमोर केली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सरकारच्या या धोरणात्मक आक्रमकतेचे सर्व थरातून स्वागत झाले. विरोधकांचीही या कारवाईला विरोध करण्याचे धाडस झाले नाही. कारण संपूर्ण देशभावना या कारवाईमागे उभी होती.

- **भारत—पाक संबंध**

भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा १९४७ साली. भारताचे विभाजन होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली. फाळणीनंतर देखील भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि अर्थिक असे अनेक समान घटक या दोन देशात कायम राहिले स्वातंत्र्यानंतर आशिया खंडात भाराताचे जे प्रमुख शेजारी देश आहेत. त्यात पाकिस्तान व चीन यांना परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान आहे. त्यांत पाकिस्तानच्या सीमेला लागूनच अफगाणिस्तान आणि इराणच्याही सीमा आहेत. परंतु पाकिस्तान ज्या ज्या वेळी सीमा प्रश्न असा शब्द प्रयोग करतो. त्या वेळी त्याचा संदर्भ प्रामुख्याने भारताशी असतो. भारताची जेव्हा फाळणी झाली तेव्हा भारताची १/५ जमीन पाकिस्तानला मिळाली.

पाकिस्तानची निर्मिती मूळात भारत द्वेषातून झाल्यामुळे सुरूवातीपासूनच पाकिस्तानने भारताच्या संदर्भात नाकारात्मक भूमिका स्वीकारली. ही नाकारात्मक भुमिका सतत कायम राहिली. पाकिस्तानच्या निर्मितीचा आधारच द्वि—राष्ट्र सिध्दांत होता. या सिध्दांताने मुस्लिम समाजात वेगळेपणाची भावना निर्माण केली. ही वेगळेपणाची भावना धार्मिक सनातनवादने वाढविली. १९०६ साली मुस्लीम लीगची स्थापन झाली. १९०९ च्या मिंटो—मार्ले सुधारणेमुळे मुस्लिम समाजाला स्वतंत्र मतदार संघ मिळाले. ब्रिटीशांनी त्यानंतर केलेल्या प्रत्येक कायदयाद्वारे ही वेगळेपणाची भावना सतत वाढतच गेली. त्यांची एक प्रतिक्रिया म्हणून हिंदू महासभेचे कार्यही वाढू लागले. सुरूवातीला बॅ. जीना हे मुस्लिम सनातनवादाचे विरोधक होते. त्यांनी १९१६ च्या लखनौ करारात महत्त्वाची भूमीका बजावली लखनौ करारामुळे काही काळ हिंदू मुस्लिम ऐक्य टिकून राहिले. परंतु पुढे भारत पाकिस्तान मधील संबंध बिघडत गेले.

डॉ. महमंद इकबाल यांनी १९३० च्या मुस्लिम लीगच्या अलाहाबाद अधिवेशनात मुसलमानांच्या स्वातंत्र राज्याचा पुरस्कार केला. पंजाब, वायव्य, सरद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्थान यांचे एकत्रिकरण करून एक स्वातंत्र्य राज्य झाल्यास मला ते आवडेल असे ते म्हणाले. यातूनच पाकिस्तानच्या निर्मितीला पोषक वातावरण निर्माण होऊ लागले.

- **काश्मीरचा प्रश्न**

ब्रिटीश संसदेकडून भारतीय स्वातंत्र्याचा कायदा मंजूर झाल्यानंतर२६ ऑक्टोबर १९४७ साली जम्मू आणि काश्मिरचे भारतात समीलीकरण झाले. भारत आणि पाकिस्तानमध्ये वर्षाभरातून आधिककाळ युध्द चालले आणि १ जून १९४७ रोजी संयुक्त राष्ट्राच्या मध्यस्थीने युध्दबंदी झाली. बहुसंख्य मुस्लिम लोकसंख्या असणाऱ्या काश्मिरचा हिंदू राजा महाराज हरिसिंग यांचे राज्य होते. मांऊट बॅटन योजनेनुसार

त्यांनी आपले राज्य स्वातंत्र्य ठेवण्याचा निर्णय घेतला होता. २० ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानी सैन्याच्या पाठींब्याने एका सशास्त्र तुकडीने कश्मिर संस्थानावर आक्रमण केले.या आक्रमणाला घाबरून महाराज हरिसिंघाने २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारताची मदत मागीतली पण मदतीसाठी ते संस्थान भारतामध्ये सामील होणे गरजेचे होते. आणि २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारत सरकार व जम्मू आणि काश्मिर मध्ये करारा होऊन जम्मू आणि कश्मिच्या संरक्षणाची जबाबदारी भारत सरकारणे घेतली. त्यानुसार काश्मीला वेगळा दर्जा देणारे ३७० कलम तयार झाले. २७ ऑक्टोबर १९४७ ला त्यामुळेच पहिले भारत—पाकिस्तान युध्द झाले. भारतीय सैन्याच्या आक्रमक भूमिकेमुळे घुसखोर आणि पाकिस्तानी सैन्य यांची पिछेहाट झाली. तरीपण आजपर्यंत हा काश्मिर प्रश्न चालूच आहे.

- **१९४७—१९४८**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटीश सत्ता समाप्त होऊन भारताची फाळणी झाली आणि भारत व पाकिस्तान अशी दोन सार्वभौम राष्ट्रे उदयास आली. १९०६ साली मुस्लीम लीग स्थापन झाला. १९०९ च्या मिंटो मोर्ले सुधारणेमुळे मुस्लिम समाजाला स्वतंत्र मतदार संघ मिळाले. यातूनच हिंदू मुस्लिम यांच्यातील वेगळेपनाची भावना वाढत गेली. १६ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटीश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्डा यांनी जातीय निवाडा जाहीर केला. या निवाडयापासून मुसलानांचे स्वतंत्र मतदारसंघ तर राखले गेलेच. शिवाय ज्या प्रांतात मुसलामान अल्पसंख्यांक होते. तेथेही त्यांना कायदेमंडळात प्रमाणाबाहेर प्रतिनिधित्व मिळाले. ब्रिटीश देखील हिंदू मुसलमानातील ही तेठ वाढवित होते. १९३७ साली प्रांतीय कायदेमंडळाण्या निवडणूका झाल्या. जुलै १९४० मध्ये बॅ.जीनांनी मुस्लिम लीगच्या मागण्या पत्राने व्हॉइस रॉयला कळविल्या. त्यापूर्वीच मार्च १९४० मध्ये मुस्लिम लीगच्य लाहोर अधिवेशनात मुस्लिम बहुसंख्यक प्रदेशांची स्वतंत्र राज्ये बनविण्याची मागणी करणारा ठराव मंजूर झाला होता. व्हॉइसरॉय लौर्ड,माऊंटबॅटन यांनीही शेवटी भारताची फाळणी हाच हिंदू मुस्लिम समस्येवर उपाय असल्याचे सुचित केले. शेवटी व्हॉइसरॉय, कॉंग्रेस आणि लीग यांच्यात वाटाघाटी होऊन फाळणीची योजना तयार झाली आणि पूर्व बंगाल, पश्चिम बंगाल, वायव्य सरहदद् प्रांत, सिंध, बलुचिस्थान, आसानमधील सिल्हेट जिल्हा हा भूप्रदेश भारतापासून वेगळा होऊन त्यांचे रूपांतर पाकिस्तानात झाले.

- **१९७१ चे युध्द**

भारतापासून विलग झालेला पाकिस्तान भोगोलिक दूर असणाऱ्या पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान या दोन भागांमध्ये विभागलेला होता. पूर्व पाकिस्तानातील लोक बांगाली संस्कृतीशी अधिक जवळ असल्याने पश्चिम पाकिस्तान मुस्लिमांकडून त्यांना दुय्यम वागणूक मिळत असे. आपल्या हक्कासाठी पूर्व पाकिस्तानातील बंगालींनी बांग्लादेश मुक्ती संग्राम सुरू केला. पाकिस्तानी अध्यक्ष यादया खान यांनी पाकिस्तानी सैन्याला पाचरण करून पूर्व पाकिस्तानातील उठाव दबवण्यास सुरूवात केली. या जाचाला कंटाळून असंख्य निर्वासित भारतात स्थळांतरीत झाले. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ ला भारताच्या हवाई तळांवर बचावात्मक हल्ले केले आणि युध्द सुरू झाले. पाकिस्तानने केलेल्या या कारवाईला **'ऑपरेशन चेंगीज'** खान म्हणतात. १३ दिवस चाललेल्या या युध्दानंतर १६डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी लष्काच्या लेफ्टनंट जनरील ए. ए. के नियाझी यांनी भारताच्या लेफट जनरल अरोरो यांच्या उपस्थित शरणागतीच्या कागदपत्रांवर सही केली. आणि २६ मार्च १९७१ रोजी बांग्लादेश पाकिस्तानपासून अलग झाला. त्यावेळी भारताच्या पंतप्रधान होत्या इंद्रिरा गांधी त्यांनी भारत व पाकिस्तानसंघर्षला पूर्णविराम देवून परस्परसंबंध सुधारण्याच्या उददिष्ठांने २ जुलै १९७२ रोजी शिमला येथे पाकिस्तानचे पंतप्रधान अली भुटट्रो त्यांनी शिमला करारा वर साक्षरी केली.

- **१९९९ चे युध्द**

१९९८—९९ मध्ये हिवाळयात जेव्हा भारतीय सैन्य उंचावरील ठिकाणांवरून खाली येत होते. तेव्हा दहशतवादयांच्या रूपात असणाऱ्या पाकिस्तानी सैन्याने कारगिल सेक्टमधील मोक्याच्या जागांवर कब्जा मिळवला. २६ मे १९९९ मध्ये भारताने या पाकिस्तानी घुसखोांविरोधात ऑपरेशन विजय सुरू केले. या युध्दात भारतीय सेना आणि हवाई दल यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. ११ जुलै १९९९ रोजी भारताने सर्व मोक्याच्या जागा परत मिळवत युध्दबंदी पुकारली.

- **भारतावर झालेले काही पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ले**
  - मुंबई बॉम्ब स्फोट — १२ मार्च १९९३
  - लाल किल्ल्यावरील दहशतवादी हल्ला — २२ डिसेंबर २०००
  - जम्मू काश्मीर विधान सभा हल्ला — १ ऑक्टोबर २००१

- भारतीय संसदेवरील हल्ला – १३ डिसेंबर २००१
- अक्षरधाम मंदिर हल्ला – २४ सप्टेंबर २००२
- मुंबई बॉम्ब स्फोट – २००३
- दिल्ली बॉम्ब स्फोट – २९ ऑक्टोबर २००५
- मुंबई रेल्वे बॉम्ब स्फोट – ११ जुलै २००६
- हैद्राबाद बॉम्ब स्फोट – २५ ऑगस्ट २००७
- जयपूर बॉम्ब स्फोट – १३ मे २००८
- मुंबईवरील दहशतवादी हल्ला – २६ नोव्हेंबर २००८
- गुरदासपूर हल्ला – २७ जुलै २०१५
- पठाणकोठ एअर स्टेशन हल्ला – २ जानेवारी २०१६
- उरी दहशतवादी हल्ला – १८ सप्टेंबर २०१६

- **भारत पाक मधील सर्जिकल स्ट्राईक**

**नियोजनबध्द आणि नेमकेपनाने केलेल्या लष्करी कार्यवाहीला सर्जिकल स्ट्राईक म्हणतात**.यामध्ये आटोपशीर व नेमकेपनाणे कारवाई केली जाते. या कारवाईत जे लक्ष असते त्यावर थेट हल्ला केला जातो. आजूबाच्या कोणत्याही गोष्ठींना या हल्यामुळे नुकसान होणार नाही यांची काळजी घेतली जाते. सर्जिकल स्ट्राईक कायदयाअंतर्गत बसणाऱ्या गोष्टींचा विचार करून शत्रुच्या तळावर हल्ला केला जातो. ठरलेल्या लक्षाचा अचूक वेध घेऊन विमानातून बॅम्ब हाल्ले करणे हे सर्जिकल स्ड्राईकचे योग्य उदाहण म्हणता येईल. या हल्यासाठी हवाई दलाची परवाणगी घ्यावी लागते. व रात्रीच्या वेळी हे ऑपरेशन केले जाते.

- **परिणाम**

सर्जिकल स्ट्राईकच्या आवश्यकतेची व परिणामाचा विचार करता केवळ एका सर्जिकल ऑपरेशनने पाकिस्तानचा बदला घेतला असे होतो काय? त्यामागची सगळी ताकद नमवणे महत्त्वाचे आहे. पूर्ण तयारीनिशी युध्दात उतरायला हवे. युध्दाचा हेतू शुध्द हवा व आपण एकाकी लढतोय हे मनात रूजवायला हवे. आपली तशी तयारी असेल तर उशीर कशाला? पाकिस्तानचे सर्जिकल ऑपरेशन अनेक वर्ष सुरूच ठेवायला हवे.

यांचे अनेक परिणाम आहेत पण महत्त्वाचे परिणाम पुढीलप्रमाणे –

१. सर्जिकल स्ट्राईकस नंतर आंतरराष्ट्रीय दबाब जानवला नाही. याउलट सार्क परिषद रद्द करावी लागल्याने पाकचे नाकच ठेचले गेले. मात्र पाक चीनच्या आणखी कहयात जाण्याची भीती आहे.

२. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील व्यापाावर परिणाम झालेला दिसून येतो. उदा. त्यावेळी भारतातून पाकिस्तानला होणारी नियीत बंद कण्यात आली होती.

३. दोन्ही देशांच्या सुरक्षतेला धोका निर्माण झाला आहे.

४. काश्मिरमधील शाळा, महाविदयालये, दवाखाने बंद करण्यात आल्याने लोकांचे स्थलांत वाढले आहे.

५. काश्मिरमधील लोकांच्या मनात असुरक्षतेची भीती निर्माण झाली आहे.

- **सारांश**

भारत स्वतंत्र्य झाल्यापासून ते आज अखेर २०१७ पर्यंत न संपलेला व कधी न संपनारा विषय म्हणजे भारत व पाकिस्तान यांच्यातील काश्मिरचा प्रश्न व त्यावरून होणारा सीमावाद. या प्रश्नामुळे नेहमीच दोन्ही देशांत युध्दजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. भारताचे विभाजन होऊनच पाकिस्तानची निर्मिती झाली आहे. तरी देखील सुरूवाती पासूनच या दोन्ही देशांचे संबंध वादग्रस्त ठरले आहेत. अंतराष्ट्रीय राजकारणात परराष्ट्र धोरणाचा विचार केला असता दोन्ही देशांनी शांतेचा मार्ग अवलंबून समाज्यस करार करणे अवश्यक आहेत. पण सुरूवातीपासून दोन्ही देशांतील परस्पर संबंधांतील समस्या, अल्पसंख्यांचा प्रश्न, पाणी वाटपाची समस्या, सीमा प्रश्न, दोन्ही देशांतील व्यापार व अर्थिक संबंध, परस्परविरोधी विचार, अंतर्गत हस्तक्षेप यामुळे दोन्ही देशांत चाललेला वाद कमी होईल असे म्हणता येत नाही. अंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला असता भारत पाकिस्तान काश्मीर प्रश्न यावरती कोणीही बोलायला तयार नाही. त्यामुळे हा वाद कधी संपेल हे सांगता येत नाही. ३० सप्टेंबर २०१६ रोजी भारतीय लष्काराणे केलेल्या सर्जिकल स्ट्राईकला संपूर्ण देशातून जनमताचा तसेच आपल्या सत्तेवर

असणाऱ्या मोंदी सरकारचाही पाठींबा मिळाला. पाकिस्तानला दिलेल्या या उरी हल्याचे प्रतिउत्तर पाकिस्तानसारख्या देश ज्याला दहशतवादी कारवाया करणारा देश म्हणतात. असा देश शांत बसेल असे म्हणता येत नाही. भारताने जसा उरी हल्याला प्रतिउत्तर दिले तशाच प्रकारचे पाकिस्तानही भारताला या सर्जिकल स्ट्राईकचे उत्तर देवू शकतो. यासाठी भारताला सतर्क राहिले पाहिजे.भारत पाकिस्तानच्या संशास्त्र संघर्षाचा इतिहास मोठा आहे. आतापर्यंत दोन्ही देशांत तीन प्रमुख युध्दे १९४७–४८, १९६५, १९७१ आणि १९९९ कारगील युध्द झाले. या सर्व युध्दामधील मूळ प्रश्न हा काश्मिरचा आहे. जो १९४७ पासून आज २०१७ पर्यंत सुरूच आहे. काश्मिरमध्ये सक्रिय असलेल्या जैश–ए–मोहम्मद, हिझबुल मुजाहिद्दीन यांसारख्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानद्वारे छुपे सहकार्य मिळते आहे. अनेक दहशतवादी संघटनांनाची मुख्यालये पाकिस्तान व्याप्त काश्मिरमध्ये खुल्याने सुरू आहेत. तिथे दहशतवादी प्रशिक्षण गटांचे कार्यही चालतात. भारताने याबाबतचे पुरावे पाकिस्तानला अनेकदा दवूनही पाकिस्तान त्याकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र सर्जिकल स्ट्राईकमुळे पाकिस्तान वठणीवर येईल असे समजणे फार भावडेपणाचे ठरेल. चार युध्दांतील पराभवानंतरही काहीच न शिकलेला पाकिस्तान आपल्या कुरापती सुरूच ठेवण्याची अधिक शक्यता आहे. त्यामुळे भारताने सावधतेने आपल्या संरक्षण यंत्रणा मजबूत करणे हिताचे ठरेल.पाकिस्तानच्या सत्तेच्या चाव्या तेथील राजकारण्यांसह लष्कर, आय. एस. आय आणि जिहादी संघटनांच्या हातात आहेत. सामान्य जनतेला भारतविरोध संबंध या एकमेव मुदयावर भडकवत ठेवत पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांनी आपला स्वार्थ साधला आहे. त्यामुळे जोपर्यत तेथील जनतेला त्यांचे खरे हित समजत नाही. त्यांना त्यांचा आवज मिळत नाही. तोवर पाकिस्तानातील भारतविरोध मावळण्याची शक्यता दूरस्थ आहे. भारत पाकिस्तानचे संबंध सुधारण्यासाठी काही संयमी आणि दीर्घकालीन प्रयत्न होणेही अगत्याचे आहे. त्यामध्ये दोन्ही बाजूच्या लोकांमध्ये अर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हितसंबंध आणि सुसंवाद निर्माण करणे हा कठीण पण सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे.

- **निष्कर्ष**

१. काश्मीरचा प्रश्न हा भारत पाकिस्तानसमोर असलेला गंभीर प्रश्न आहे. तो साडवण्यासाठी दोन्ही देशांनी आपासी मतभेद मिटवणे गरजेचे आहे.

२. भारत पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी काही संयमी व दिर्घकालीन प्रयत्न करणे अवश्यक आहे.

३. दोन्ही देशांत चालला सीमा वाद, पाणी वाटप वाट, अंतर्गत हस्तक्षेप कमी करून मित्रत्वाचे धोरणे स्वीकारणे गरजेचे आहे.

४. पाकिस्तानने भारतावर होणारे दहशतवादी हल्ले बंद करावे आणि दहशतवादी संघटनांना मदत करणे बंद करावे.

५. हिंदू मुस्लिम लोकांमध्ये धार्मिकतेचा आव पुढे आनून त्यांच्यात कुटीटतावाद न वाढवता दोन्ही देशांतील लोकांना धर्मनिरपेक्ष, सामाजधिष्ठीत संस्कृतीक समाजासाठी व शांततेच्या मार्गाने सर्व प्रश्न सोडवणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे वरील प्रयत्न करून दोन्ही देशांचे अर्थिक व राजकीय संबंध सुधारता येतील. त्यामुळे कदाचीत हा दहशतवाद व कश्मीरचा प्रश्न सुटू शकेल. पण पूर्णता मिटवता येईल असे म्हणता येणार नाही.

- **संदर्भ सुची**

➢ भारताचे परराष्ट्र धोरण – डॉ. इंगोले, प्रा. साबणे
➢ चाणक्य मंडल परिवार स्पर्धापरीक्षा तयारी (मासिक) – नोब्हेंबर २०१६
➢ यशाची परिक्रमा (मासिक) – नोब्हेंबर २०१६
➢ सप्तरंग (सकाळ मासिक) –नोब्हेंबर २०१६
➢ बुलेटिंग (युनिक ॲकॉडमी मासिक) –नोब्हेंबर २०१६
➢ लोकसत्ता पेपर संपादकीय – १८ ऑक्टोबर २०१६
➢ महाराष्ट्र टाईम्स – ३० सप्टेंबर २०१६